**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२- २९४५१००१
**Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in**

प्रेसनोट क्र. १०- २०२२ दिनांक ०८/०१/२०२२

------------

# गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या अड्ड्यावर कारवाई गुन्हे शाखा -3 यांची कामगिरी

-------00000-------

दि. ०८/०१/२०२२ रोजी सकाळी ०७.३० वाजेच्या सुमारास गुप्त बातमीदार यांच्यामार्फत गुन्हे शाखा-०३ मधील अधिकारी व अंमलदारयांना माहिती मिळाली की, अर्नाळा किल्ल्याच्या परिसरात, मौजे अर्नाळा येथे बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टी दारुचे उत्पादन होत आहे. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अर्नाळा किल्ल्याचे जे.टी. मौजे अर्नाळा, पासुन १०० मिटर अंतरावर मोकळया जागेत छापा कारवाई करुन सदर कारवाईमध्ये १,५२,७५०/- रुमये किंमतीचा मुद्देमाल त्यात १) २०० लिटर क्षमतेचे २७ निळया रंगाचे प्लास्टीकचे पिंप त्यात ५,४०० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश. २) तिन तांबा धातुच्या टाक्या, दोन तांबा धातुचे थाळीचा टाव (सतेले), ३) ३५ लिटर क्षमतेचे १५ काळया रंगाचा प्लास्टीकचे कॅन त्यात ५२५ लिटर गावठी हातभट्टीची दारु ४) दोन लाकडी चाटु त्यास स्टिल धातुची नळी असलेले असा मुदेदमाल जप्त करुन जागेवर नष्ट करण्यात आला. सदर कारवाईमध्ये अज्ञात ५ ते ६ आरोपीत यांच्याविरुध्द अर्नाळा सागरी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ०८/ २०२२ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ब) (फ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. पद्मजा बढे सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि प्रमोद बडाख, वरिष्ठ पोलीस निरिक्षक गुन्हे शाखा ०३, पो.उप.निरी उमेश भागवत पो.ना. सागर बारवकर, मनोज सकपाळ, सचिन घेरे, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, पो.अं. राकेश पवार यांनी केलेली आहे.







---------oooo----------